# हवामान आधारीत कृषि सल्ला


## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com


### ७०) जिल्हा: नंदुरबार-हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०१ डिसेंबर २०२३

| AGRO-AWS मागील आठवड्यातील हवामान नोंदी (२४/११/२०२३ ते ३०/११/२०२३) | | | | | | | हवामान घटक | भारतीय हवामान विभाग हवामान अंदाज (०२/१२/२०२३ ते ०६/१२/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | दिनांक | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ० | ० | ० | ५२ | ६ | ० | ० | पाऊस (मिमी) | ८ | ९ | ० | ० | ० |
| ३१.६ | ३१.८ | २२.१ | १९.९ | २५.६ | २६.१ | २७.३ | कमाल तापमान (अं.से.) | २९ | ३० | ३० | २९ | २९ |
| २० | २०.७ | २१.१ | १८.७ | २० | २०.८ | २१.५ | किमान तापमान (अं.से.) | १८ | १८ | १७ | १५ | १५ |
| अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ७७ | ७७ | ९७ | १०० | १०० | ९६ | १०० | स. सापेक्ष आर्द्रता (%) | ७६ | ७२ | ६८ | ६६ | ६४ |
| ४१ | ४२ | ७१ | १०० | ७४ | ७४ | ७४ | दु. सापेक्ष आर्द्रता (%) | ४५ | ४५ | ४५ | ४० | ४१ |
| १४ | १४ | १६ | ११ | ६ | ८ | ८ | हवेचा वेग (किमी/तास) | ९ | १३ | १० | ११ | ११ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| | | |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार, दिनांक १ व २ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमाल तापमान २९ ते ३० अंश सेल्सिअस तर किमान तापमान १५ ते १८ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित हवामान अंदाज | | ६ ते १२ डिसेंबर २०२३ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे. |
| **पीक** | **अवस्था** | **कृषीहवामान सल्ला** |
| सामान्य सल्ला | | शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी “मेघदुत” ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | रबी पिकांची पेरणी पुरेश्या ओलाव्यावर लवकरात लवकर पूर्ण करावी. |
| कापूस | वेचणी | पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| गहु | पेरणी ते रोप वाढीची | पिकांची पेरणी पुरेश्या ओलाव्यावर लवकरात लवकर पूर्ण करावी. पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. |
| हरभरा | रोप वाढीची | ढगाळ हवामानामुळे घाटे अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असून नियंत्रणासाठी हरभरा पिकास ५ टक्के निंबोळी अर्क फवारणी हवामान कोरडे असताना करावी. पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| रब्बी मका | रोप वाढीची | पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| रबी ज्वारी | रोप वाढीची | पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| तुर | शेंगा वाढीची अवस्था | पावसामुळे उशिरा पेरलेल्या तूर पिकामध्ये फुलगळ होत असल्यास, नॅप्थलिन ॲसेटिक ॲसिड (एन.ए.ए.) या संजीवकाची २० मिलि प्रति १०० लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी. पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. |
| कांदा | वाढीची अवस्था | पावसामुळे कांदा पिकात मर रोग दिसून आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी पाण्यात घेऊन आवळणी करावी. करपा रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा टेब्यूकोन्याझोल १० मिली प्रति १० लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. |
| पपई | फळ वाढीची | पावसामुळे खराब झालेल्या किंवा पडलेल्या पाने, फांद्या इत्यादी बागेबाहेर टाकून नष्ट करावीत. पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| केळी | फळ वाढीची | पावसामुळे खराब झालेल्या किंवा पडलेल्या पाने, फांद्या इत्यादी बागेबाहेर टाकून नष्ट करावीत. पिकात संभाव्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतातून पावसाचे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| मिरची | - | पावसामुळे भिजलेल्या मिरच्या पथारीवर/ताडपत्रीवर वाळत ठेवाव्यात. |
| पशुसंवर्धन | - | थंडीमुळे जनावरांना न्युमोनिया हा आजार होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या शरीराचे तापमान वाढते व त्यांचे खाणे-पिणे कमी होते. यासाठी थंडीपासून जनावरांचे संरक्षण करावे. थंड वाऱ्यापासून संरक्षणासाठी शेडला पडदे लावावे. |
| कुक्कुटपालन | - | थंड वातावरणात कोंबड्या जास्त प्रमाणात बळी पडतात. त्यासाठी शेडमध्ये ७ दिवसांपर्यंत पक्षी व्यवस्थित ब्रूडिंग करावी. तापमान वाढवण्यासाठी जास्त व्हॅटचे बल्ब लावावेत आणि थंड वाऱ्यापासून संरक्षणासाठी शेडला पडदे लावावे. पक्षांना उर्जा व प्रथिने युक्त पशुआहाराचा समावेश करून आहार वाढवावा. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार
दि. : ०१/१२/२०२३

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक
जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार